मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमधील 42 'मिसिंग लिंक'चा प्रश्न मार्गी!

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आश्वासन : आमदार लांडगे यांची आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील 42 'मिसिंग लिंक' साठी दि. 25 मे पूर्वी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी कालबद्ध नियोजन केले जाईल. त्या अनुशंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यवाही करणार आहे, असे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. त्यामुळे 'मिसिंग लिंक' मुळे रखडलेल्या रस्त्यांची कामे मार्गी लागणार आहेत.



भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवड शहराशी निगडीत विविध मुद्यांवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्रजी डुडी यांच्यासोबत पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. यामध्ये शहरातील वाहतूक सक्षमीकरणाच्या दृष्टीने 'मिसिंग लिंक', भूसंपादन, डुडुळगाव इको टुरिझम पार्क, महावितरण संबंधित कामांकरीता निधीची उपलब्धता, गायरान जमीन महापालिका हस्तांतरण प्रकरणे आदी मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी नगर रचना विभागाचे उपसंचाक प्रसाद गायकवाड, भूसंपादन विभागाचे समन्वयक कल्याण पांढरे, सहायक नगर रचनाकार उषा विश्वासराव, उपअभियंता कुटे, भूमि अभिलेख विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

विशेष म्हणजे, शहरातील 42 'मिसिंग लिंक' साठी दि. 25 मे पूर्वी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी कालबद्ध नियोजन केले जाईल. भोसरी मतदार संघात महापालिकेच्या इ-फ-क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत चऱ्होली, दिघी, चिखली या भागातील रस्त्याने विकसित होणारा परिसरामधील जमीन मालक यांचेकडून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल. तसेच, जागा ताब्यात न आल्यास भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले असेल, तर त्यावर प्राधान्याने कार्यवाही करावी. त्यासाठी आगामी दोन दिवसांत कामकाज सुरू करावे, असे आदेश भूसंपादन विभागास जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

### गायरान जमीन हस्तांतरणाला गती...

» भोसरी विधानसभा मतदार संघातील मोशी येथे आयआयएम नागपूर या संस्थेला आगाऊ ताबा देणेबाबत जदलगतीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच, 220/33 केव्ही वीज उपकेंद्र उभारणीसाठी कागदपत्रांची लवकर पूर्तता झाल्यास जागा हस्तांतरणाची प्रक्रिया राबवण्यात येईल. तत्पूर्वी, मनपा प्रशासनाकडून आरक्षण फेरबदल करण्याची प्रक्रिया लवकर करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी यांनी केली आहे. तसेच, सफारी पार्कबाबत सुधारीत प्रस्ताव मनपा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयास तत्काळ प्रस्ताव दाखल करावा, असेही आदेश दिले आहेत.

> शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. नागरिकरण आणि औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे वाहतूक नियोजन आणि सक्षमीकरणासाठी प्राधान्याने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराचा उल्लेख 'फ्युचर सिटी' म्हणून केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील एकूण ४२ 'मिसिंग लिंक' चे काम पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करीत आहोत. दि. 25 मे पर्यंत रस्त्यांची कामे मार्गी लागतील, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यानी दिले आहे.
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# निगडी ते लोणावळा 'मेट्रो डीपीआर तयार करा'

## मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांची मागणी : पुणे मेट्रो प्रशासनाला निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकहिताच्या दृष्टिकोनातून 'निगडी ते लोणावळा' मेट्रो डीपीआर तयार करण्यात यावा, अशी मागणी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी केली आहे. यावेळी त्यांनी पुणे मेट्रो प्रशासनाचे संचालक अतुल गाडगीळ यांची भेट घेत निवेदन दिले.



याबाबत सचिन चिखले यांनी पुणे मेट्रो प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे व पिंपरी चिंचवड शहराला लागून मावळ हा भाग येतो. सध्या पिंपरी ते भक्ती-शक्ती, निगडी मेट्रोचे काम प्रगतीपथावर चालु आहे. नुकतेच काही दिवसांपुर्वी महामेट्रोचे बजेट सादरीकरण झाले. या दरम्यान, संपूर्ण पुणे जिल्ह्यातील महामेट्रोचे सादरीकरण करण्यात आले तसेच बजेट विषयी व त्याचप्रमाणे पब्लिक ट्रान्सपोर्ट विषयी चर्चा करण्यात आली. पुणे व पिंपरी चिंचवड शहराच्या लगतच असणाऱ्या मावळ या भागातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, कामगार, शेतकरी तसेच व्यावसायिक, कामगारवर्ग यांची मोठ्या प्रमाणात प्रवास चालु असतो.

दरम्यान, देहुरोड, तळेगाव, वडगाव, कामशेत, लोणावळा हा भाग मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्तीचा झाला आहे. शैक्षणिक प्रयोजन तसेच उद्योग, व्यावसायिक दृष्टिकोनातून येथील नागरिकांची पुणे व पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात लगबग असते. व्यावसायिक आणि कामगार वर्गासाठी मोठ्या प्रमाणावर दळणवळण म्हणजे व्यवसायातील विविध व्यक्ती, संस्था आणि उपक्रमांमध्ये संवाद साधणे, माहिती आणि वस्तूंची देवाणघेवाण करणे. यातून व्यवसायाची कार्यक्षमता, उत्पादकता आणि आर्थिक विकास वाढतो. त्यामुळे लोकहिताच्या दृष्टिकोनातून 'निगडी ते लोणावळा' हा मेट्रो मार्ग होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी येणाऱ्या बजेटमध्ये आपण हा मार्ग घ्यावा व लवकर डिपीआर तयार करून मंजुर करावा, अशी मागणी सचिन चिखले यांनी केली आहे. यावेळी सचिन उदागे, दिपक खैरनार, प्रबुद्ध कांबळे तसेच गणेश वाघमारे उपस्थित होते.

# पुणे विमानतळावरील तेरा उड्डाणे रद्द

## पुणे विमानतळावरून 13 उड्डाणे रद्द : भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेत वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

'ऑपरेशन सिंदूर'मुळे आणि भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर देशातील अनेक विमानतळांवरील उड्डाण सेवा तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या आहेत. गुरुवारी (दि. 8) पुणे विमानतळावर किमान 13 उड्डाणे रद्द करण्यात आली. रद्द झालेल्या उड्डाणांमध्ये इंडिगो आणि स्पाइसजेट या विमानसेवा कंपन्यांचा समावेश होता. यामुळे अमृतसर, कोची, हैदराबाद, जयपूर यांसारख्या महत्त्वाच्या शहरांशी असलेली देशांतर्गत हवाई संपर्क व्यवस्था प्रभावित झाली.



विमानतळ प्रशासनाने सांगितले की सर्व प्रभावित प्रवाशांना विमान कंपन्यांकडून थेट संपर्क, डिजिटल अलर्ट्स आणि सार्वजनिक घोषणा यांसारख्या विविध माध्यमांतून माहिती देण्यात आली आहे.

'डीजीसीएच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आमच्या ग्राउंड टीम्सनी विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांशी समन्वय साधत योग्य ती कार्यवाही केली. प्रवाशांना पूर्ण परतावा किंवा त्यांच्या सोयीप्रमाणे पुन्हा उड्डाणाचे वेळापत्रक देण्यात आले आहे,' असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानमधील शहरांवर 'एअर स्ट्राइक' केल्यानंतर देशातील अनेक महत्त्वाचे विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. तर काही महत्त्वाच्या शहरांमधील विमानतळावरील हवाई वाहतूक बाधित झाली आहे. यात पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचाही समावेश आहे. बुधवारी पुणे विमानतळावरून पाच शहरांसाठीची विमानसेवा रद्द करण्यात आली होती.

### रद्द करण्यात आलेली उड्डाणे

» इंडिगो एअरलाइन्स (IndiGo Flights)

अमृतसर : पुणे (6E 6129)
पुणे : कोचीन (6E 6129)
चंदीगड : पुणे (6E 681)
पुणे : हैदराबाद (6E 336)
राजकोट (हिरासर) : पुणे (6E 957)
पुणे : जोधपूर (6E 133)
पुणे : चंदीगड (6E 242)
पुणे : अमृतसर (6E 721)
पुणे : राजकोट (हिरासर) (6E 956)
पुणे : सूरत (6E 6191)
जोधपूर : पुणे (6E 414)

» स्पाईसजेट एअरलाइन्स (SpiceJet Flights)

पुणे : भावनगर (SG 1077)
पुणे : जयपूर (SG 1080)

# पुण्यात मार्चपेक्षा एप्रिलमध्ये टँकरफेऱ्यांमध्ये घट

## गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये टँकरच्या फेऱ्यांमध्ये वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मार्च महिन्यापेक्षा एप्रिल महिन्यात उन्हाचा कडाका वाढलेला असतानाही टँकरच्या संख्येत घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. मार्च महिन्यात ४७ हजार ८९६ टँकर फेऱ्यांद्वारे पाणी देण्यात आले होते. तर, एप्रिलमध्ये कडक उन्हाळा असतानाही टँकरफेऱ्यांची संख्या ६० ने घटली आहे. एप्रिल २०२५ मध्ये ४७ हजार ८३६ टँकरफेऱ्यांची नोंद पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केली आहे.




गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये टँकरच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा ६ हजार २३३ टँकरच्या फेऱ्या वाढल्या आहेत. २०२४-२५ वर्षामध्ये एप्रिल महिन्यात पुणे शहरातील विविध भागांमध्ये टँकरच्या ४१ हजार ६०३ फेऱ्या झाल्या होत्या. तर, एप्रिल २०२५-२६ या वर्षात ही संख्या ४७ हजार ८३६ इतकी झाली आहे. मार्च २०२५ मध्ये शहरातील विविध भागांमध्ये ४७ हजार ८९६ टँकरच्या फेऱ्या झाल्या आहेत. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील टँकरफेऱ्यांच्या नोंदीतून ही बाब समोर आली आहे.

शहराचा वाढत असलेला विस्तार आणि पाण्याची वाढती मागणी त्यामुळे दरवर्षी मार्च ते मे या तीन महिन्यांमध्ये टँकरची संख्या वाढत असते. दरवर्षी टँकरच्या फेऱ्यांमध्ये मार्च पेक्षा एप्रिल महिन्यात आणि एप्रिलपेक्षा मे महिन्यात वाढ होते. मात्र यंदाच्या वर्षी एप्रिल महिन्यात उन्हाची तीव्रता वाढवून देखील मार्च महिन्याच्या तुलनेत टँकर फेऱ्यांची संख्या ६० ने कमी झाल्याची नोंद पाणीपुरवठा विभागाकडे झाल्याची माहिती पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

### टँकरचालकांकडून लूट

» वाढत्या शहरीकरणामुळे टँकरची मागणी वाढली आहे. अनेक मोठ्या सोसायट्यांमधील नागरिकांची पाण्याची गरज भागविण्यासाठी टँकरने पाणी घ्यावे लागते. उन्हाळ्याच्या तीन महिन्यांमध्ये पाण्याची मागणी वाढल्याने टँकरची संख्याही वाढते. याचा फायदा घेत अनेक खासगी टँकरचालक मनमानी शुल्क आकारून नागरिकांची लूट करतात. टँकरसाठी किती शुल्क घ्यावे, यावर कोणतेही नियंत्रण महापालिकेचे नाही. त्यामुळे टँकरचालकांकडून भरमसाठ शुल्क आकारून अडवणूक केली जाते, अशी तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

> मार्च महिन्याच्या तुलनेत एप्रिलमध्ये उन्हाचा चटका वाढवूनही टँकरफेऱ्यांमध्ये घट झाली आहे. मार्च महिन्यात टँकरची मागणी वाढली होती. शहरातील सर्व भागांमध्ये पुरेसे पाणी देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.
>
> **- नंदकिशोर जगताप, पाणीपुरवठा विभाग प्रमुख, पुणे महापालिका.**

# अनधिकृत रिक्षा स्टॅण्डचे फुटले पेव वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण

## अनधिकृत स्टॅण्डच्या विळख्यातून चौक मोकळे कधी होणार, असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील केवळ ७७ रिक्षा स्टॅण्डच अधिकृत असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. पण, शहरातील चौकाचौकात रिक्षा स्टॅण्ड पाहायला मिळतात. या रिक्षा स्टॅण्डला ना आरटीओची परवानगी, ना वाहतूक पोलिसांची परवानगी ! लावली पाटी अन् झाला स्टॅण्ड अशीच सर्वत्र स्थिती असल्याचे दिसून येते. यामुळे शहरातील चौकांमध्ये वाहतूक कोंडी होत आहे. पण, वाहतूक पोलिस आणि आरटीओ अनधिकृत रिक्षा स्टॅण्डवर 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनधिकृत स्टॅण्डच्या विळख्यातून चौक मोकळे कधी होणार, असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत.

पिंपरी-चिंचवडच्या आरटीओ कार्यालयात ५ मे पर्यंत ४४ हजार ७९४ रिक्षांची नोंद झाली आहे. शहरात दिवसेंदिवस रिक्षांची संख्या वाढत आहे. आठ- दहा रिक्षा चालक एकत्र येत एखादी संघटना स्थापन करतात. अन् शहरातील मोक्याच्या ठिकाणी, मुख्य चौकात, एसटी स्टॅण्ड बाहेर, रेल्वे स्थानकांबाहेर, मेट्रो स्थानकांबाहेर पाटी लावून स्टॅन्ड सुरु करतात. पण, स्टॅण्डसाठी कोणतीही परवानगी घेतली जात नसल्याचे दिसून येते. स्टॅण्डवर रिक्षा अस्ताव्यस्त उभ्या राहत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. शहरातील वाहतूक कोंडी होण्यामागे असलेल्या अनेक कारणांपैकी रिक्षा स्टॅण्ड हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे. पण, यावर कोणतीही कारवाई होत नाही.

दोन रिक्षा स्टॅण्डमध्ये १०० मीटर अंतर किंवा नागरिकांच्या गरजेनुसार स्टॅण्ड असावा, असा नियम आहे. पण, शहरात अनेक ठिकाणी बाजू बाजूलाच रिक्षा स्टॅण्ड असल्याचे दिसून येते.

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील रिक्षा स्टॅण्डची जागा निश्चित करण्यासाठी शेवटचा सर्व्हे २०११-१२ मध्ये झाला होता. १५ वर्षात रिक्षांची संख्या दहा पट वाढली आहे. तसेच अनधिकृत रिक्षा स्टॅण्डची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.



### आरटीए कमिटी (प्रादेशिक परिवहन प्राधिकरण),

» आरटीओ, वाहतूक शाखा, महापालिकेचे प्रतिनिधी, रिक्षा संघटनेचे प्रतिनिधी, प्रवासी संघटनेचे प्रतिनिधी यांच्यामार्फत सर्व्हे केला जातो. हा रिपोर्ट आरटीओमार्फत आरटीए कमिटीमध्ये ठेवला जातो. मग कमिटीकडून मान्यता मिळते किंवा नाकारला जातो. आरटीए कमिटीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. सचिव प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) तर सदस्य पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराचे वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त असतात.

### पिंपरी आरटीओ क्षेत्रातील रिक्षा संख्या

| | |
|---|---|
| » २०१९ - | ६,०७० |
| » २०२३ - | ३४,५५९ |
| » २०२४ - | ६,२९४ |
| » २०२५ - | २,४२३ |

### वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

» वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिस खासगी वाहने टोईंग करून घेऊन जातात. मात्र, वाहतूक कोंडीसाठी काही प्रमाणात जबाबदार असलेल्या अनधिकृत रिक्षा स्टॅण्डवर उभ्या असलेल्या रिक्षांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे या रिक्षा चालकांवर आणि स्टॅण्ड कोणाच्या आशीर्वादाने सुरु आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

"पंधरा वर्षापूर्वी सर्व रिक्षा स्टॅण्ड रद्द करून, नव्याने पुन्हा रिक्षा स्टॅण्ड तयार केले. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांसाठी एक हजार रिक्षा स्टॅण्डला परवानगी दिली होती. पण, त्यानंतर सर्व्हेशनच झालेले नाही. त्यामुळे अनधिकृत रिक्षा स्टॅण्डचे पेव फुटले. पिंपरी चिंचवड शहरासाठी पोलिस आयुक्त कार्यालय आणि आरटीओ स्वतंत्र झाले आहे. त्यांनी आतापर्यंत सर्व्हे करणे अपेक्षित होते. पण, अजूनही सर्व्हे केलेला नाही.

- नितीन पवार, रिक्षा पंचायत

# रिंग रस्ता अचूक मोजमापासाठी जीपीएस प्रणालीचा अवलंब

## चक्राकार वाहतूक रस्ता, इतर अंतर्गत रस्ते आणि प्रकल्पासाठी जीएनएसएस याअंतर्गत जीपीएस प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणअंतर्गत नियोजित चक्राकार वाहतूक रस्ता, इतर अंतर्गत रस्ते आणि प्रकल्पासाठी जीएनएसएस याअंतर्गत जीपीएस प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे जागेच्या ठिकाणी जाऊन त्याचे अचूक मोजमाप घेता येते. तसेच, त्याची नेमकी माहिती व लोकेशनही जतन करून ठेवता येते. यामुळे कमी वेळेत जास्त काम होत असून, पहिल्यांदाच रिंग रस्त्याच्या मोजमापासाठी याचा वापर केला जाणार आहे.

पीएमआरडीएच्या हद्दीत जमीन व मालमत्ता विभागाच्या वतीने नुकतेच भूमापकांना जीएनएसएसबाबत प्रशिक्षण देण्यात आले. याचबरोबर (आरटीके) रियल टाईम किनमॅटिक या प्रणालीबाबतदेखील माहिती देण्यात आली. या अद्ययावत यंत्रणेमुळे काम सोपे आणि लवकर होणार आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही स्थानाचे अवघ्या 3 ते 5 सेंटिमीटरपर्यंत अचूक मोजमाप करणे शक्य होणार आहे. याबाबत प्रशिक्षणात भूमी अभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, उपअधीक्षक शिवाजी पंडित यांनी मार्गदर्शन केले.

यापूर्वी या संबंधित कामे पीएमआरडीएकडून करण्यात येत नव्हती. त्यामुळे खासगी यंत्रणेचा वापर करावा लागत होता. परिणामी, त्यासाठी वेळ लागत होता. तसेच, या यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत होते. त्यानंतर आता पीएमआरडीएकडून ही कामे केली जाणार आहेत. त्याठी जीएनएसएस आणि कॉर्स या प्रणाली अंमलात आणल्या जात आहेत.

नियोजित रस्त्याचे सीमांकन हे अचूकतेने होण्यासाठी या प्रणालीची वापर करण्यात येणार असून, जीएनएसएस म्हणजेच ग्लोबल नेव्हिगेशन सॅटलाईट सिस्टिम या माध्यमातून त्याचा मोजमाप काढण्यात येणार आहे. सर्वेक्षणच्या मशिनद्वारे सेटलाईटकडून संदेश देत त्याबाबतची माप साठवले जाते. प्रत्येक ठिकाणी आणि नेमून दिलेल्या ठिकाणी जावून त्याची माहिती गोळा केली जाते. त्या डेटाच्या आधारे पुढे नकाशा तयार करण्यात येतो आणि तो प्रकल्पासाठी अथवा रस्त्याला वापरला जातो.



### ही कामे होणार सोपी

» डी. पी. रस्त्याचे सीमांकन
» भूसंपदानाचे अचूक आणि योग्य मोजमाप
» टीडीआर बदल्यात सुविधांचे हस्तांतरण
» इलिव्हेशन

# सांत्वन करण्यासाठी आलेल्या सुप्रिया सुळेंवर शेतकऱ्याकडून प्रश्नांचा भडीमार

## पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी, कुंभारवळण या सात गावातील शेतकऱ्यानी विमानतळ प्रकल्पाला जाहीरपणे विरोध केला

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळ प्रकल्पाला विरोध करणारे स्थानिक शेतकरी आणि पोलिसांत शनिवारी (दि. 3) जोरदार झटापट झाली. याच कालावधीत कुंभारवळणमध्ये एका महिलेचे निधन झाले. या नंतर संबधित महिलेच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी आलेल्या खा. सुप्रिया सुळे यांच्यावर शेतकऱ्यांनी अक्षरशः प्रश्नांचा भडीमार केला. तुम्हाला मतदान मिळावे म्हणून रात्रंदिवस प्रचार केला, मात्र एवढा मोठा प्रकार होवूनही तुमचा एकही पदाधिकारी साधा फिरकला देखील नाही. अशा शब्दात त्यांना शेतकऱ्यांनी निरुत्तर केले. तुम्ही विमानतळाच्या बाजूने का शेतकऱ्यांच्या? असाही प्रश्न जाहीरपणे विचारला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी, कुंभारवळण या सात गावातील शेतकऱ्यांनी विमानतळ प्रकल्पाला जाहीरपणे विरोध केला असून कित्येक दिवस त्याविरोधात आंदोलन सुरु आहे. मागील महिन्यात सासवड येथील प्रशासकीय कार्यालाय्समोर तीन दिवस उपोषण केले, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा देखील नेला .प्रकल्पबाधित गावांमध्ये जमिनीचा सर्व्हे करण्यास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांकडून अमानुषपणे लाठीहल्ला झाला. यामध्ये कित्येक शेतकरी जखमी झाले. मात्र पोलिसांनी शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करून अटकही केली. याची दखल संपूर्ण राज्यस्तरावरून घेण्यात आली. मात्र मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादीच्या एकही पदाधिकाऱ्याने शेतकऱ्यांची साधी विचारपूस सुद्धा केली नाही त्यामुळे शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात रोष होता.

वनपुरी गावचे माजी सरपंच नामदेव कुंभारकर यांनी सुप्रिया सुळेंना म्हणाले की, आम्ही तीन दिवस उपोषण केले, पुण्याला मोर्चा नेला, आमच्यावर लाठीहल्ला होवून कित्येक शेतकरी जखमी झाले, संपूर्ण राज्याने दखल घेतली. मात्र तुमच्यासाठी दिवसरात्र प्रचार केला आणि तुम्च्यासाहित राष्ट्रवादीच्या एकाही नेत्याने साधी दाखल घेतली नाही. त्यामुळे आमचे चुकले का ? असा जहरी प्रश्न उपस्थित करताच त्यांना उत्तर देताना सुप्रिया सुळे यांच्यासह पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांना घाम फुटला होता.



### उदाचीवाडीतील 120 एकर जमिनीमुळे तुम्ही शांत?

» खासदार सुप्रिया सुळे यांनी कुंभारवळण येथील मृत्यू झालेल्या अंजना कामथे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यानंतर शेतकऱ्यांची चर्चा करताना शेतकऱ्यांनी अक्षरशः प्रश्नांची सरबत्ती केली. उदाचीवाडी येथील संतोष हगवणे यांनी बोलताना ताई तुम्ही पुरंदरला आल्यावर एक बोलता आणि मुंबई, दिल्लीमध्ये वेगळे बोलता. मग तुम्ही विमानतळाच्या कि शेतकऱ्यांच्या बाजूने ? असा थेट प्रश्न उपस्थित केला तर सातही गावात चर्चा आहे कि उदाचीवाडी मध्ये 120 एकर जमीन तुमची असल्याने तुम्ही शांत आहात का ? असा प्रश्न उपस्थित करून अक्षरशः गोंधळ उडवून दिला.

### तुमच्यासाठी कोणाच्याही दारात यायला तयार

» पुरंदर एक तर शिक्षक किंवा तरकारीमध्ये कामाला होता मात्र शरद पवार यांनी याच भागात पाणी आणून शेतीला दिले. माझ्या प्रत्येक भाषणात पुरंदरच्या शेतकऱ्यांना विमानतळाला विरोध नाही तर जागेला विरोध आहे. जिथे जागा असेल तिथे विमानतळ करा असे म्हणाले आहे. याजागेवर करा असे कधीही म्हणाले नाही. मी कोणत्याही विकासकामाला विरोध केला नाही आणि तुमची इच्छा नसेल तर करू नका. आपल्याला शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवायचे आहेत. तुमच्यासाठी कोणाच्याही दारात यायला तयार आहे असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

“माझी अथवा आमच्या परिवाराची पुरंदर तालुक्यात एक इंचही जमीन नाही. कोठे सातबारा असेल तर मला दाखवा, आपण निम्मीनिम्मी वाटून घेवू असे खुले आव्हान दिले. तसेच चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवून संभ्रम निर्माण करू नये. दरम्यान तालुक्यातील सर्व नेत्यांना मी फोन करून मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री यांना भेटून सांगू. ज्यांनी लाठी काठी चालविण्याचे आदेश दिले त्यांची मी स्वतः चौकशी लावणार आहे.”

\- सुप्रिया सुळे, खासदार

# खोरला सरपंचपदाची लढत होणार अटीतटीची; आगामी पंचवार्षिक निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष

## माजी सरपंच ज्ञानेश्वर चौधरी पुन्हा कुल गटाकडून उतरण्याची शक्यता; थोरात गटाकडून उमेदवारांची चाचपणी सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

खोर (ता. दौंड) येथील ग्रामपंचायतीचा कार्यकाल लवकरच संपुष्टात येत असून, आगामी पंचवार्षिक निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. खोर ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण हे नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी घोषित झाले आहे.

कुणबी जातप्रमाणपत्राच्या आधारे मोठी अटीतटीची लढत या वेळी पाहवयास मिळणार आहे. अनेक इच्छुकांनी कुणबी जातप्रमाणपत्र काढण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून, या वर्षीची सरपंचपदाची लढाई रंगतदार होणार आहे.

आमदार राहुल कुल व माजी आमदार रमेश थोरात गट खोर गावात सक्रिय आहेत. दोन्ही गटांकडून सरपंचपदाचा उमेदवार कोण राहील, याबाबतची पडताळणी सुरू झाली आहे. एकंदरीतच दोन्ही गटांकडून सरपंचपद आपल्याकडे येण्यासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. सन 2011 ते 2015 पर्यंत खोर ग्रामपंचायतीवर आमदार राहुल कुल गटाचा झेंडा होता.

यादरम्यान खोरचे तत्कालीन सरपंच ज्ञानेश्वर चौधरी यांनी सन 2012 ते 2013 मध्ये एक वर्षाच्या कालावधीत पाण्याच्या मुद्द्यावर आवाज उठविला. वेळप्रसंगी दौंड तहसीलदार कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग अवलंबिला. वरवंडच्या व्हिक्टोरिया तलावामधून खोर गावाला ग्रामीण पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून गावाला पाण्याची योजना राबविण्यात आली.

दरम्यान, आगामी पंचवार्षिक निवडणुकीत कोणत्या गटाचा झेंडा फडकणार, याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. माजी आमदार रमेश थोरात गटाकडून सध्या उमेदवारीच्या संदर्भात चाचपणी सुरू असल्याचे माजी सरपंच रामचंद्र चौधरी यांनी सांगितले.



### सरपंचपदाची लढाई जोरदार होणार

» रिंगणात उतरण्यासाठी ठोस चेहरा अजून तरी समोर आलेला नाही. मात्र, आमदार राहुल कुल गटामधून खोर गावच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा माजी सरपंच ज्ञानेश्वर चौधरी यांनी सरपंचपदासाठी उमेदवारीच्या रिंगणात उतरावे, अशी मागणी आता ग्रामस्थांमधून पुढे येऊ लागली आहे. सरपंचपदाची लढाई ही मात्र कुल-थोरात यांच्यात जोरदार होणार, हे तितकेच खरे.

### सरपंच विकासकामांना प्राधान्य देणारा असावा

» खोर परिसरात सुरू चाललेले औद्योगिकीकरण, गावाच्या उशाशी सुरू असलेले छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे खोर गावाची पुढील वाटचाल प्रगतीच्या दिशेने असणार आहे. त्यामुळे खोर गावाचा सरपंच हा विकासकामांना प्रथम प्राधान्य देणारा असावा, असे मत या परिसरातील ग्रामस्थांचे आहे.